२९/५

20160112120715330

# महाराष्ट्र शासन

क्र.: विकाअ २००८/७३७/प्र.क्र.३०८/५
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : 29/8/2008

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,

विषय : विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींने त्यांच्या नावाखाली विशेष कार्यकारी अधिकारी असा दरवाज्यावर फलक लावण्याबाबत.

ज्या विभागात "विशेष कार्यकारी अधिकारी" पदावर नियुक्त झालेल्या व्यक्ती रहातात त्या विभागातील लोकांना विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नावाचा फलक लावलेला नसल्यामुळे त्याबाबतची माहिती नसते. त्यामुळे साक्षांकनाच्या कामासाठी संबंधित शाळा/महाविद्यालयाचे प्राचार्य/उप प्राचार्य व विद्यार्थी यांच्यावर मोठा ताण पडतो. शाळा/महाविद्यालये प्रवेशासाठी साक्षांकनाची फार आवश्यकता असते ही वस्तुस्थिती लक्षात घेता विशेष कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीच्या घरासमोर, दुकानासमोर, ऑफीससमोर त्यांचे स्वतःचे नावासह "विशेष कार्यकारी अधिकारी" असा फलक (बोर्ड) त्यांनी लावल्यास लोकांची मोठी सोय होईल. तरी जिल्हाधिका-यांना विनंती की, त्यांनी ही बाब त्यांच्या जिल्हयातील सर्व विशेष कार्यकारी अधिका-यांच्या निदर्शनास कृपया आणावी.

(प्र.मा.माळवदकर)
उप सचिव